आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२९ एप्रिल २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा मुद्दा भारताने संयुक्त राष्ट्रसंघात उपस्थित केला

- पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संसदेचं विशेष अधिवेशन घेण्याची विरोधी पक्षनेत्यांची मागणी

- काश्मीर खोऱ्यातली ४८ पर्यटन स्थळं पर्यटकांसाठी बंद ठेवण्याचा जम्मू कश्मीर सरकारचा निर्णय

- शिक्षण आणि नवोन्मेष क्षेत्रातल्या गुंतवणुकीसाठीच्या युग्म परिषदेचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**आणि**

- कॅनडातल्या सार्वत्रिक निवडणुकीत मार्क कार्नी यांच्या नेतृत्वाखाली लिबरल पक्षाची विजयाकडे वाटचाल

<><><><><>

विकसित भारताच्या तंत्रज्ञानातल्या भविष्याशी संबधित सर्व भागीदार युग्म या परिषदेत एकत्र आले आहेत. असं सांगत प्रधानमंत्र्यांनी भारताने तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात केलेली प्रगती नमूद केली. युग्म या धोरणात्मक परिषदेला आज दिल्लीत भारत मंडपम इथं सुरुवात झाली. त्या परिषदेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी संबोधित केलं. भारताची संशोधन क्षमता आणि डीप टेकमध्ये भारताची क्षमता वाढवण्यासाठी जे प्रयत्न होत आहेत त्याला या परिषदेच्या आयोजनातून बळ मिळेल असं ते म्हणाले. परिषदेच्या माध्यमातून आयआयटी कानपूर आणि आयआयटी मुंबई इथे कृत्रिम बुद्धिमत्ता, गुप्तवार्ता, जैवतंत्रज्ञान आणि वैद्यकशास्त्र यासाठीच्या भव्य केंद्राची सुरुवात होत आहे, असं त्यांनी सांगितलं.

संशोधन स्तरावर भारताच्या प्रगतीचा आढावा घेताना त्यांनी, भारतीय उच्च शिक्षण संस्थातून २०१४ या वर्षात सादर झालेल्या पेटंटची संख्या ४० हजार होती ती आता ८० हजाराहून जास्त झाल्याचं सांगितलं. नवीन शैक्षणिक धोरणामुळे भारताच्या शिक्षण पद्धतीत लक्षणीय बदल होत आहेत. भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी विद्यार्थी घडवण्याच्या दृष्टीनं नवीन शैक्षणीक धोरण राबवलं जात आहे असं सांगत त्यांनी या धोरणाची वैशिष्ट्ये आणि त्यातून शिक्षणक्षेत्रात होत असलेले बदल नमूद केले.

**होल्ड....बाईट-प्रधानमंत्री**

देशातल्या शिक्षणपद्धतीचा एकविसाव्या शतकाच्या गरजांशी मेळ घालण्यासाठी सरकार जोमाने प्रयत्न करत आहे. प्रतिभा, वृत्ती आणि तंत्रज्ञान ही भारताच्या यशाची त्रिसूत्री असल्याचं सांगून त्यांनी जगातल्या सर्वोच्च दर्जाच्या शिक्षणसंस्था देशात आल्या आहेत एवढंच नव्हे तर भारतातल्या संस्थांसुद्धा परदेशात शाखा उघडत आहेत असं नमूद केलं. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला जागतिक संशोधन प्रकाशनांपर्यंत पोहचता यावं यासाठी प्रधानमंत्री रिसर्च फाउंडेशन कार्यरत आहे असंही त्यांनी सांगितलं.

युग्म या परिषदेला सरकार, शैक्षणिक संस्था, उद्योग आणि नवोन्मेष परिसंस्थेतील अग्रणी उपस्थित आहेत. भारताच्या नवोन्मेष परिसंस्थेत खाजगी गुंतवणूकीला प्रोत्साहन देणे, प्रमुख तंत्रज्ञानात संशोधन ते व्यावसायीकरण प्रक्रियेला गती देत शिक्षण उद्योग आणि सरकार ही भागीदारी मजबूत करणे आणि त्यायोगे विकसित भारत @2047 साठी राष्ट्रीय नवोन्मेषाच्या आराखड्याला चालना देणे हे या परिषदेचं उद्दिष्ट आहे.

<><><><><>

वेव्हज् २०२५ परिषदेमुळे देशातल्या तरुणांना खूप लाभ होईल, असं माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी म्हटलं आहे. वेव्हजच्या केंद्रस्थानी आजची तरुणाईच असून कौशल्यविकास, स्वयंउद्योजकता आणि जागतिक सहकार्य क्षेत्रातल्या नव्या वाटा यामुळे खुल्या होतील, असा विश्वास त्यांनी यासंदर्भातल्या लेखात व्यक्त केला. देशातला माध्यम आणि मनोरंजन उद्योग आज अडीच ट्रिलियन रुपयांपेक्षा जास्त असून सर्जनशीलता, नवोन्मेष आणि स्वयंउद्योजकता क्षेत्रात जगाचं नेतृत्व करायचं भारताचं ध्येय वेव्हज् २०२५ मधून अधोरेखित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा मुद्दा भारताने संयुक्त राष्ट्रसंघात जोरकसपणे उपस्थित केला आहे. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी एकप्रकारे दहशतवाद्यांना पैसा आणि प्रशिक्षण पुरवल्याची कबुली दिली असल्याचं भारताच्या उप स्थायी प्रतिनिधी योजना पटेल यांनी काल सांगितलं. ख्वाजा आसिफ यांनी काही दिवसांपूर्वी एका दूरचित्रवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत पाश्चात्य देशांसाठी पाकिस्तानने दहशतवादी संघटनांना आश्रय दिल्याची कबुली दिली होती, हे साऱ्या जगाने ऐकलंच आहे, असं त्या म्हणाल्या. पाकिस्तान उलट भारतावरच बेछूट आरोप करत असल्याबद्दल त्यांनी टीका केली. पहलगाम हल्ल्यानंतर जगातल्या अनेक देशांनी भारताला मजबूत पाठिंबा एकमुखाने दिल्याचं सांगून पटेल यांनी त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

<><><><><>

पहलगाम हल्ल्यातल्या मृतांप्रती संवेदना प्रकट करण्यासाठी आज अमेरिकेतल्या भारतीय समुदायाकडून विविध ठिकाणी प्रार्थना सभा आयोजित करण्यात आल्या. न्यू जर्सीच्या एडिसन इथं ३०० अमेरिकन भारतीयांनी या प्रार्थना सभेत भाग घेतला. कनेक्टिकट, कोलंबसमधल्या ओहियो, त्याचबरोबर

कॅनडा, डेन्मार्क, इंग्लंड, फ्रान्स, फिनलंड, जर्मनी आणि स्पेनमध्येही श्रद्धांजली सभाचं आयोजन करण्यात आलं.

<><><><><>

काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी, पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संसदेचं विशेष अधिवेशन घेण्याची मागणी केली आहे. तसं पत्र त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना लिहिलं आहे. दहशतवादाविरुद्ध देशाची एकता दर्शवण्यासाठी आणि मृतांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी हे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी या दोन्ही नेत्यांनी या पत्रात केली आहे. काँग्रेसच्या या मागणीवर भाजपाने टीका केली आहे. ही वेळ चर्चा करण्याची नसून पाकिस्तानला धडा शिकवण्याची असल्याचं ज्येष्ठ नेते अनुराग ठाकूर यांनी म्हटलं आहे. काँग्रेसने या संदर्भात आधी आपली भूमिका स्पष्ट करावी असं आवाहन भाजपा प्रवक्ता शहजाद पूनावाला यांनी केलं आहे. काँग्रेसच्या काही नेत्यांनी या हल्ल्यासाठी भारतालाच जबाबदार धरलं आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

पहेलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर काश्मीर खोऱ्यातली ४८ पर्यटन स्थळं पर्यटकांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय जम्मू कश्मीर सरकारने घेतला आहे. खोऱ्यात एकूण ८७ पर्यटनस्थळं आहेत. इतर स्थळांना योग्य सुरक्षा पुरवल्याचं सरकारनं म्हटलं आहे. पहेलगाम ह्ल्ल्यानंतर काश्मीरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या लक्षणीयरित्या घटली आहे. श्रीनगर विमानतळावरची प्रवाशांची वर्दळही कमी झाली आहे.

<><><><><>

कॅनडाच्या सार्वत्रिक निवडणूक निकालाचे कल आले असून मार्क कार्नी यांच्या नेतृत्वाखालील लिबरल पार्टी १६७ जागांवर आघाडी घेऊन विजयाच्या

उंबरठ्यावर पोहोचली आहे. तर पीअर पॉइलीवर यांची कॉन्झर्वेटिव्ह पार्टी १४५ जागांवर आघाडीवर आहे. कॅनडाच्या ३४३ सदस्यांच्या संसदेत बहुमत मिळवण्यासाठी १७२ जागा जिंकणं आवश्यक आहे. त्यामुळे लिबरल पार्टी विजयाच्या जवळ पोहोचली आहे. सक्षम आणि स्वतंत्र कॅनडाच्या निर्मितीसाठी नागरिकांनी तयार राहावं, असं आव्हान कार्नी यांनी केलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडावर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना ते कधीही शक्य नाही, असंही ते म्हणाले.

**<><><><>**

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स हा सामना दिल्लीत रंगणार आहे. सामना संध्याकाळी साडेसातला सुरु होईल. काल झालेल्या सामन्यात राजस्थान रॅायल्सने गुजरात टायटन्सचा आठ गडी राखून पराभव केला. गुजरात टायटनच्या २०९ धावांना प्रत्युत्तर देताना राजस्थान रॅायल्सने २५ चेंडू राखत हे आव्हान पार केलं. अवघ्या १४ वर्ष वयाच्या वैभव सूर्यवंशीने ३८ चेंडूत १०१ धावा फटकावत सर्वात कमी वयात वेगवान शतक झळकवण्याचा विक्रम नोंदवला. वैभवने आपल्या या तडाखेबंद खेळीत सात चौकार आणि ११ षटकार लगावले.

**<><><><>**

महिला क्रिकेटमधे श्रीलंकेत सुरु असलेल्या तिरंगी स्पर्धेत आज भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेबरोबर सुरु आहे. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ५० षटकांमधे भारताच्या ६ बाद २७६ धावा झाल्या आहेत. प्रतिका रावळच्या ७८ धावा हे भारताच्या डावाचं वैशिष्ट्य.

**<><><><>**

परशुराम जयंती आज साजरी होत आहे. यानिमित्त ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी परशुराम जयंतीच्या

शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान परशुराम यांचे आशीर्वाद प्रत्येकाचं जीवन धैर्य आणि शक्तीने भरतील अशी अपेक्षा, मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात व्यक्त केली.

//<><><><><>//